# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/03/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक २४/०४/२०२० चे १५.२१ वा. दरम्यान फिर्यादी नामे– निशा मुन्शी यादव, वय २६ वर्ष, रा. कुंडा ता. गौरचौराई जि. छिंदवाडा मध्यप्रदेश यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. २९०/२०२० कलम ३०७, ५०७ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २४/०४/२०२० चे ०१.३० वा. दरम्यान फिर्यादी व नमुद आरोपी नामे– हरीप्रसाद रामकरण भलावी, वय ३५ वर्ष, रा. देसली ता. बैसदेही जि. छिंदवाडा मध्यप्रदेश यांचे प्रेमसंबंध होते नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी हीने तिच्या गावात राहणाऱ्या मुलासोबत फोनवर का बोलली या कारणावरून आरोपीने फिर्यादीचे डोक्यावर मोठया दगडाने मारून जिवानीशी ठार मारण्याचे उद्देशानं जखमी केले.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे पोस्टे कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक १०/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश नागपूर यांनी वरील नमुद आरोपीस कलम ३०७ भांदवि मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व १५,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०६ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ. प्रमोद कडबे पोस्टे कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

## घरफोडीचा प्रयत्न

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मौजा पारशिवनी येथे दिनांक ०९/०३/२०२३ चे १५.३० वा. ते १६.३० वा. दरम्यान यातील अनोळखी आरोपीने फिर्यादी नामे– गौतम चरनदास सोमकुंवर, वय २९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, पेंच रोड सोनालीका हार्डवेअर जवळ पारशिवनी याच्या मोटरसायकलला लावलेल्या चाबी सोबत असलेल्या खालच्या माळयाचे चाबीने घराला लावलेले दाराचे कुलूप उघडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार १०८९ गजानन उके बोंन्दे मो. क्र. ९८८१२४१०८९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**